
ePaper

## ‘राहुल, प्रियांका गांधी वायनाड विसरा’ असे पोस्टर्स लावणं चांगलंच भोवलं




वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज™

WWW.MAHAENEWS.COM | सोमवार, दि. 18 मे 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!


पान 3 वरुन...
मोशी-चिखलीत दूषित खाद्यपदार्थांचा बाजार तेजीत

## मॉस्कोवर मोठा हल्ला; भारतीय दूतावासाची मदत, रशियाचा तीव्र निषेध

# रशियावर युक्रेनचा प्रहार; भारतीयाचा मृत्यू

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**युक्रेनने रशियाची राजधानी मॉस्कोवर केलेल्या भीषण ड्रोन हल्ल्यात एका भारतीय कामगाराचा मृत्यू झाला असून तीन जण जखमी झाले आहेत. रशियातील भारतीय दूतावासाने या घटनेला दुजोरा देत जखमी कामगारांची भेट घेऊन मदतीची खात्री दिली आहे.**



भारतीय दूतावासाने सोशल मीडियावर निवेदन जारी करत या घटनेबद्दल तीव्र दुःख व्यक्त केले आहे. जखमी आणि प्रभावित कामगारांना आवश्यक ती सर्व मदत पुरवण्यासाठी कंपनी व्यवस्थापन आणि स्थानिक प्रशासनाशी सतत संपर्कात असल्याचे दूतावासाने स्पष्ट केले. मृत आणि जखमी भारतीयांची ओळख अद्याप जाहीर करण्यात आलेली नाही.

रशियन अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, रविवारी रात्री झालेला हा हल्ला गेल्या काही महिन्यांतील मॉस्कोवरील सर्वात मोठा ड्रोन हल्ला मानला जात आहे. हल्ल्यादरम्यान शहरात एअर रेड सायरन वाजले, स्फोटांचे आवाज ऐकू आले आणि अनेक ठिकाणी ड्रोनचे अवशेष पडल्याच्या घटना घडल्या.

रशियाच्या संरक्षण मंत्रालयाने दावा केला आहे की, २४ तासांत १,००० हून अधिक युक्रेनी ड्रोन हवेतच निकामी करण्यात आले. मॉस्कोचे महापौर सेर्गेई सोब्यानिन यांनी किमान ८१ ड्रोन पाडल्याची माहिती दिली. तरीही या हल्ल्यांमुळे निवासी इमारती आणि पायाभूत सुविधांचे मोठे नुकसान झाले आहे. या हल्ल्यात किमान चार जणांचा मृत्यू झाला असून त्यात मॉस्को प्रदेशातील तिघांचा आणि बेळगोरोड भागातील एका व्यक्तीचा समावेश आहे.

दरम्यान, रशियाने काही दिवसांपूर्वी युक्रेनची राजधानी कीव्हवर मोठा हवाई हल्ला केला होता. त्यानंतर युक्रेनचे अध्यक्ष व्होलोडिमिर झेलेन्स्की यांनी सडेतोड प्रत्युत्तराचा इशारा दिला होता. हा ड्रोन हल्ला त्याचाच भाग असल्याचे मानले जात आहे. झेलेन्स्की यांनी या कारवाईला "पूर्णपणे न्याय्य उत्तर" असे म्हटले आहे.

रशियाने मात्र या हल्ल्याचा तीव्र निषेध करत युक्रेनवर नागरिकांना लक्ष्य केल्याचा आरोप केला आहे. रशियन परराष्ट्र मंत्रालयाने या घटनेला "दहशतवादी हल्ला" असे संबोधले आहे. चार वर्षांपासून सुरू असलेल्या रशिया-युक्रेन युद्धामुळे दोन्ही देशांतील तणाव अधिकच वाढला असून, या नव्या हल्ल्यामुळे परिस्थिती आणखी चिघळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

### ड्रोन हल्ल्यात भारतीयाचा मृत्यू

मॉस्कोवरील युक्रेनच्या भीषण ड्रोन हल्ल्यात एका भारतीय कामगाराचा मृत्यू झाला, तर तीन जण जखमी झाले. भारतीय दूतावासाने घटनास्थळी भेट देत मदतीची खात्री दिली असून, या हल्ल्यामुळे रशिया-युक्रेन तणाव अधिकच तीव्र झाला आहे.

### युद्धाच्या ज्वाळा भडकल्या; भारतीयांनाही फटका

रशिया-युक्रेन संघर्ष दिवसेंदिवस अधिक तीव्र होत असून त्याची झळ आता परदेशात काम करणाऱ्या भारतीयांनाही बसू लागली आहे. मॉस्को परिसरात झालेल्या मोठ्या ड्रोन हल्ल्यात एका भारतीय कामगाराचा मृत्यू झाला, तर तीन जण जखमी झाले आहेत. हवाई संरक्षण यंत्रणेकडून अनेक ड्रोन पाडण्यात आले असले तरी काही ठिकाणी मोठे नुकसान झाले आहे.

अचानक झालेल्या स्फोटांमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून नागरिकांमध्ये घबराट पसरली आहे. भारतीय दूतावासाने तातडीने मदतकार्य सुरू करत जखमींना आवश्यक ती मदत दिली जात असल्याचे सांगितले आहे. या घटनेमुळे युद्धाची तीव्रता आणखी वाढली असून दोन्ही देशांतील संघर्ष अधिकच चिघळण्याची चिन्हे दिसत आहेत.

# देशी गोसंशोधन केंद्रासाठी निधी मंजूर

## प्रशिक्षण केंद्रात प्रयोगशाळा, गोठे व प्रशिक्षण सुविधा उभारणीला सुरुवात

महाईन्यूज । पुणे

**येथील शासकीय कृषी महाविद्यालयाच्या अजितदादा पवार देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्रास राज्य सरकारने 72.75 कोटींचा निधी मंजूर केलेला आहे. त्याअंतर्गत पहिल्या टप्प्यात प्रयोगशाळा उभारणी, शेतकरी वसतिगृह बांधकाम, प्रशिक्षण हॉल व प्रशासकीय इमारतीसह अन्य कामांना सुरुवात झाली. पुढील दोन वर्षांत हे केंद्र पूर्णक्षमतेने कार्यान्वित होण्याची अपेक्षा या केंद्राचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. सोमनाथ माने यांनी व्यक्त केली आहे.**

दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी या केंद्रासाठी नोव्हेंबर 2020 पासून वेळोवेळी विशेष अर्थसाहाय्य मंजूर केल्यामुळेच हा प्रकल्प कार्यान्वित होऊन देशी गायींच्या संवर्धनास मोठी मदत झालेली आहे. ज्याचा उपयोग महात्मा फुले कृषी विद्यापीठांतर्गतच्या 10 जिल्ह्यांतील शेतकऱ्यांना होणार आहे. राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठाअंतर्गत येथील कृषी महाविद्यालयातील हा प्रकल्प सर्वांचे लक्ष वेधून घेत आहे.

या केंद्रात भारतातील दुधासाठी प्रसिद्ध असलेल्या देशी गायींचे संवर्धन, संगोपन व जतन केले जात आहे. यामध्ये सहिवाल, गीर, राठी, थारपारकर, लाल सिंधी आदी देशी गायींचे प्रात्यक्षिक युनिट तयार केले आहे. या माध्यमातून महाराष्ट्रातील देशी गायींचे दूध उत्पादन वाढविण्याचा प्रयत्न प्रभावीपणे सुरू आहे. या प्रकल्पात 13 पेक्षा अधिक भारतीय देशी गायींच्या जातींचे संगोपन व संवर्धन केले जात आहे.



> भविष्यात प्रकल्पाअंतर्गत सौर ऊर्जा व बायोगॅस आधारित शाश्वत प्रकल्प उभारण्याचे नियोजन करण्यात आले आहे. तसेच, गोपर्यटन केंद्राचा विस्तार करून आधुनिक, तंत्रज्ञानाधारित व पर्यावरणपूरक पशुपालन मॉडेल विकसित करण्यात येणार आहे. या माध्यमातून संशोधन, प्रशिक्षण, पर्यटन व शाश्वत शेती यांचा एकात्मिक विकास साधण्याचा उद्देश आहे.
>
> - डॉ. विलास खर्चे, कुलगुरू, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी

### अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने देशी गायींच्या आरोग्याची नियमित तपासणी

या केंद्रामध्ये अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने देशी गायींच्या आरोग्याची नियमित तपासणी केली जाते. शेतकऱ्यांना देशी वाणांच्या गायींबाबत प्रशिक्षण व मार्गदर्शन देण्यासाठी विशेष कार्यशाळांचे आयोजन करण्यात येत आहे. देशी गायींच्या दूधातील पोषणमूल्ये आणि औषधी गुणधर्म याबाबत संशोधनही या केंद्रात सुरू आहे. गायींच्या उत्तम संगोपनासाठी आधुनिक गोठे, स्वच्छता व्यवस्था आणि संतुलित आहार प्रणाली विकसित करण्यात आली आहे.

### पहिल्या टप्प्यात सुरू असलेली कामे

अद्ययावत गायींचे गोठे, सायलो बंकर उभारणी, बायोगॅस युनिट निर्मिती, कंपोस्टिंग व स्टोरेज युनिट्स, प्रयोगशाळा उभारणी, शेतकरी वसतिगृह बांधकाम, प्रशिक्षण हॉल व प्रशासकीय इमारत, सेल्स काउंटर व प्रदर्शन गॅलरी, जुन्या गोठ्यांचे नूतनीकरण, दुग्ध प्रयोगशाळा, अधिकारी व कर्मचारी निवासस्थानांचा समावेश आहे. दुसऱ्या टप्प्यात प्रकल्पातील उर्वरित कामांचा समावेश आहे.

---

# पुण्यात अल्पवयीन मुलींवर अत्याचार, शिवसेना (शिंदे) पक्षाचा जनआक्रोश मोर्चा

महाईन्यूज । पुणे

**शहरात अल्पवयीन मुलींवरील वाढत असलेल्या अत्याचारांच्या घटनांविरोधात पुणे शहर शिवसेना (शिंदे) पक्षाच्या वतीने कोंढवा येथील खडीमशीन चौकात जनआक्रोश मोर्चा काढण्यात आला. आरोपींना फाशी झालीच पाहिजे, चिमुकल्यांवरील अत्याचार बंद झालेच पाहिजेत, अशा घोषणा यावेळी देण्यात आल्या. दरम्यान, येवलेवाडी येथील अल्पवयीन मुलीवर झालेल्या अत्याचार प्रकरणातील आरोपीला अटक करण्यात आली असल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक मारुती पाटील यांनी दिली.**

शिवसेना (शिंदे) पक्षाचे शहरप्रमुख प्रमोद उर्फ नाना भानगिरे यांनी या मोर्चाचे नेतृत्व केले. पक्षाच्या महिला आघाडी, शिवसेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने मोर्चात सहभागी झाले होते. यात स्वाती टकले, सुदर्शन त्रिगुनाईत, संगीता ठोसर, अमर घुले, पंकज कोद्रे, सुभाष घुले, दत्ता खवळे, सुहास पडवळ यांचा समावेश होता. शिवसेना (शिंदे) पक्षाच्या वतीने विविध घोषणांनी परिसर दणाणून गेला असून नागरिकांनीही या मोर्चाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. संबंधित मागण्यांकडे प्रशासनाने तातडीने लक्ष द्यावे, अन्यथा आणखी तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा पदाधिकाऱ्यांनी यावेळी दिला.




### आंदोलनासाठी मोठा पोलिस बंदोबस्त तैनात

खडीमशीन चौकातून येवलेवाडी पोलीस उपायुक्त कार्यालयाकडे मोर्चा काढण्यात आला. या ठिकाणी ठिय्या आंदोलन करत प्रशासनाविरोधात घोषणाबाजी करण्यात आली. आंदोलना दरम्यान मोठा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. आंदोलनकर्त्यांनी अल्पवयीन मुलींच्या सुरक्षेसाठी स्वतंत्र विशेष यंत्रणा उभारण्याची मागणी केली. तसेच संवेदनशील भागांत वाढीव पोलिस गस्त, शाळा परिसरात विशेष सुरक्षा व्यवस्था ठेवण्याची मागणी करण्यात आली.

### अल्पवयीन मुलींच्या सुरक्षेसाठी विशेष यंत्रणा उभारण्याची मागणी

खडीमशीन चौकातून येवलेवाडी पोलीस उपायुक्त कार्यालयाकडे मोर्चा काढण्यात आला. ठिय्या आंदोलन करत प्रशासनाविरोधात घोषणाबाजी करण्यात आली. आंदोलना दरम्यान मोठा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. अल्पवयीन मुलींच्या सुरक्षेसाठी स्वतंत्र विशेष यंत्रणा उभारण्याची मागणी यावेळी करण्यात आली. तसेच संवेदनशील भागांत वाढीव पोलिस गस्त, शाळा परिसरात विशेष सुरक्षा व्यवस्था आणि लैंगिक अत्याचार प्रकरणांमध्ये झिरो टॉलरन्स धोरण राबविण्याची मागणी देखील करण्यात आली.

> चिमुकल्या मुलींवरील अत्याचार ही अत्यंत गंभीर बाब आहे. अशा घटना वाढत असून समाजाच्या नैतिक अध:पतनाची धोकादायक स्थिती निर्माण झाली आहे. घरात, नात्यात आणि परिसरात मुली सुरक्षित नसतील, तर ही चिंतेची बाब आहे. पोलिस प्रशासनाने या प्रकरणातील दोषींवर कोणतीही दया,माया न दाखविता कठोर कारवाई करावी.पोलीसांकडे कायदा आणि सुव्यवस्थेती जबाबदारी आहे. त्यामध्ये कोणताही हलगर्जीपणा खपवून घेतला जाणार नाही.
>
> - प्रमोद भानगिरे, शहर प्रमुख, शिवसेना (शिंदे) पक्ष, पुणे.

# मोशी-चिखलीत दूषित खाद्यपदार्थांचा बाजार तेजीत

## अन्नसुरक्षा नियम धाब्यावर; लहान मुलांच्या आरोग्याला मोठा धोका

महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड

**चिखली, मोशी, स्पाइन रोड परिसरात गेल्या काही दिवसांत विनापरवाना खाद्यपदार्थांचा व्यवसाय करणाऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. या परिसरात मिळणाऱ्या खाद्यपदार्थांपासून ते पाण्यापर्यंतच्या अनेक गोष्टींचा दर्जा कमालीचा खालावला असल्याचे चित्र सध्या पाहायला मिळत आहे.**



सध्या शाळांना उन्हाळ्याच्या सुट्या असल्याने मुले घराबाहेर पडत आहेत, ज्यामुळे रस्त्यावरील आणि बागेसमोरील उघड्यावरील अन्नपदार्थ खाण्याकडे त्यांचा कल वाढला आहे. मात्र, या विक्रेत्यांकडे अन्नसुरक्षा विभागाचा परवानाच नसेल, तर प्रशासन त्यांच्यावर नेमकी काय आणि कशी कारवाई करणार, असा प्रश्न आता स्थानिक नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.


या गंभीर समस्येचे निवारण करण्यासाठी अन्न व औषध प्रशासनाने एक स्वतंत्र पथक नियुक्त करणे अत्यंत गरजेचे आहे. असे पथक तयार झाल्यास प्रत्येक विक्रेत्याकडील परवान्याची आणि त्यांच्या खाद्यपदार्थांच्या दर्जाची सखोल तपासणी करणे शक्य होईल. आज राज्यभरात अनेक ठिकाणी भेसळयुक्त अन्नपदार्थ जप्त केले जात असताना, या परिसरात मात्र अशा घातक पदार्थांचा सर्रास वापर करून लोकांच्या जीवाशी खेळ केला जात आहे. भविष्यात जर एखाद्या नागरिकाला किंवा लहान मुलाला या दूषित अन्नामुळे जीवघेणा त्रास झाला, तर याला जबाबदार कोण, याचे उत्तर प्रशासनाला द्यावे लागेल. त्यामुळे लोकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या अशा घटकांवर तातडीने चाप बसवणे आवश्यक आहे.

### कायद्याकडे विक्रेत्यांचे दुर्लक्ष

या संपूर्ण प्रकरणावर प्रशासनाची बाजू समजून घेतली असता, विनापरवाना खाद्यपदार्थांची विक्री करणाऱ्यांवर तब्बल 10 लाख रुपयांपर्यंतच्या दंडाची कायदेशीर तरतूद आहे. हा अन्न सुरक्षा परवाना ऑनलाइन पद्धतीने अत्यंत सोप्या प्रक्रियेद्वारे उपलब्ध करून दिला जातो, तसेच घरगुती स्तरावर खाद्यपदार्थांचा व्यवसाय करणाऱ्यांसाठीही तो बंधनकारक करण्यात आला आहे. कायदा अस्तित्वात असला तरी त्याची अंमलबजावणी कठोरपणे होणे गरजेचे आहे. आता प्रशासनाने कोणतीही दिरंगाई न करता या परिसरात तातडीने कडक पावले उचलण्याची मागणी जोर धरत आहे.

“ खाद्यपदार्थांचा व्यवसाय करण्यासाठी ऑनलाइन पद्धतीने परवाना मिळवणे अत्यंत सोपे आहे. विनापरवाना व्यवसाय करताना आढळल्यास 10 लाख रुपयांपर्यंतच्या दंडाची तरतूद कायद्यात आहे. आगामी काळात विनापरवाना विक्रेत्यांविरोधात मोहीम तीव केली जाणार असून, परवाना न घेणाऱ्या व्यावसायिकांवर मोठा दंड भरण्याची नामुष्की ओढवू शकते.

- दिगंबर भोगावडे, सह आयुक्त, अन्न व औषध प्रशासन विभाग




# शासकीय वाहनांचा उघड अपव्यय; पार्किंगमध्येच इंजिन सुरू

महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड

**इंधन बचत करा, सार्वजनिक वाहतुकीचा वापर वाढवा, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आवाहन केले असताना शहरातील विविध क्षेत्रीय कार्यालये, तहसील कार्यालय परिसर, पालिका कार्यालये आणि शासकीय दवाखान्यांबाहेर मात्र याच्या नेमके उलट चित्र पाहायला मिळत आहे. अधिकारी कार्यालयात गेल्यानंतर त्यांचे वाहने पार्किंगमध्ये तासनतास सुरूच ठेवून चालक एसी, म्युझिक आणि मोबाईलवरील रिल्सचा आनंद घेत बसलेले दिसून आले.**



विशेष म्हणजे काही वाहने इलेक्ट्रिक तर काही पेट्रोल-डिझेलवर चालणारी आहेत. मात्र, इलेक्ट्रिक गाडी असल्याने काही फरक पडत नाही, असा काही चालकांचा सूर होता; परंतु शहरात इलेक्ट्रिक वाहनांना आग लागण्याच्या घटना घडत असताना वाहने दीर्घकाळ सुरू ठेवणे कितपत सुरक्षित आणि योग्य, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

### साहेबांना गाडी थंड लागते

याबाबत चालकांकडे विचारणा केली असता काहींनी साहेब बाहेर येतात तेव्हा त्यांना गाडी थंड हवी असते, असे सांगितले. तर, काहींनी गाडी इलेक्ट्रिक आहे, त्यामुळे इंधन जळत नाही, असे कारण पुढे केले. मात्र, प्रश्न फक्त इंधनाचा नाही; विजेच्या अपव्ययाचाही आहे. एका बाजूला सामान्य नागरिक बस, मेट्रो आणि सार्वजनिक वाहतुकीचा वापर करून खर्च आणि इंधन बचतीचा प्रयत्न करत आहेत. तर, दुसऱ्या बाजूला प्रशासनातील अधिकारी आणि सत्ताधारी यंत्रणा स्वतःच नियमांकडे दुर्लक्ष करत असल्याची भावना नागरिकांमध्ये वाढत आहे.

“ अधिकाऱ्यांना गाडी देणे हे टेंडर प्रक्रियेतून झाले आहे. संबंधित कंत्राटदाराची गाडी किती चालली याचे लॉगशीट विभागामध्ये तयार होते आणि त्यानुसार बिल दिले जाते. इलेक्ट्रिक गाड्या कंत्राटदाराकडून उपलब्ध करून दिल्या जात असल्याने त्याचा थेट भुर्दंड पालिकेवर पडत नाही. वीजमीटर आणि चालकही कंत्राटदाराचेच असतात. पेट्रोल-डिझेल वाहनांसाठी विभागीय कार्यालयामार्फत लॉगशीट तयार केले जाते. वापर आणि ॲव्हरेजनुसार पेमेंट केले जाते. मात्र, पार्किंगमध्ये गाड्या बंद ठेवण्याबाबत परिपत्रक काढून कंत्राटदारांना सूचना दिल्या जातील.

- सचिन मोरे, प्रभारी कनिष्ठ अभियंता, यांत्रिकी विभाग



## भूमिका

**मध्यपूर्वेतील वाढता संघर्ष, जागतिक राजकारणातील अस्थिरता आणि कच्च्या तेलाच्या वाढत्या किमतींचा थेट परिणाम आता भारतीयांच्या दैनंदिन जीवनावर दिसू लागला आहे. केंद्र सरकारने पेट्रोल आणि डिझेलच्या दरात प्रतिलिटर तीन रुपयांची वाढ जाहीर केल्यानंतर सर्वसामान्यांच्या अडचणीत आणखी भर पडली आहे.**

# महागाईच्या आगीत होरपळणारा सामान्य नागरिक



अनेक शहरांत पेट्रोलचे दर शंभरीपार गेले असून, त्याचे पडसाद आता बाजारपेठेत स्पष्टपणे उमटत आहेत. डिझेल महागल्याने मालवाहतुकीचा खर्च वाढणार आणि परिणामी जीवनावश्यक वस्तूंच्या किमती भडकणार, हे उघड वास्तव आहे.आधीच महागाई, बेरोजगारी आणि घटते उत्पन्न यामुळे त्रस्त असलेल्या सामान्य नागरिकांसाठी ही दरवाढ म्हणजे आर्थिक संकटावर आणखी एक घाव आहे.

होर्मुझ सामुद्रधुनीतील तणावामुळे जागतिक तेलपुरवठा साखळी धोक्यात आली आणि आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमती वाढल्या. भारतासारख्या आयाताधारित देशावर त्याचा परिणाम होणे स्वाभाविक असले, तरी सरकारने परिस्थिती हाताळण्यात आवश्यक ती दूरदृष्टी दाखवली का, हा प्रश्न निर्माण होतो. युद्ध सुरू झाल्यानंतर तज्ज्ञांनी इंधन दरवाढीचा इशारा दिला होता. मात्र, सरकारकडून सातत्याने “सर्व काही नियंत्रणात आहे” असा दावा केला जात होता. विशेष म्हणजे, पश्चिम बंगालसह पाच राज्यांच्या निवडणुका संपल्यानंतर लगेचच इंधन दरवाढ जाहीर करण्यात आली. त्यामुळे हा निर्णय आर्थिक गरजेपेक्षा राजकीय सोयीचा होता का, अशी शंका निर्माण होणे साहजिक आहे.

निवडणुकांच्या काळात दर स्थिर ठेवणे आणि मतदान संपताच जनतेवर आर्थिक भार टाकणे, ही लोकशाहीतील पारदर्शकतेला धक्का देणारी बाब आहे. सरकारचा दावा आहे की, वाढत्या कच्च्या तेलाच्या किमतीमुळे तेल कंपन्यांना मोठा तोटा सहन करावा लागत होता. या दाव्यात तथ्य असले, तरी दुसरी बाजूही महत्त्वाची आहे. जेव्हा आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमती कमी होत्या, तेव्हा त्याचा लाभ सामान्य ग्राहकांना देण्यात आला नाही. उलट, अबकारी कर वाढवून सरकारने मोठा महसूल जमा केला. आज मात्र संकटाच्या काळात त्याच जनतेवर अतिरिक्त भार टाकला जात आहे. इंधन दरवाढ हा केवळ आर्थिक विषय नाही; तो सरकारच्या संवेदनशीलतेची आणि प्राधान्यक्रमांची परीक्षा घेणारा मुद्दा आहे.

केंद्र आणि राज्य सरकारांनी इंधनावरील करांचा पुनर्विचार करणे आवश्यक आहे. अनेक राज्यांमध्ये इंधनावर मोठ्या प्रमाणात उपकर आकारला जातो, त्यामुळे दर आणखी वाढतात. आर्थिक शिस्तीअभावी सरकारे महसुलासाठी करांवर अवलंबून राहतात आणि त्याचा फटका सामान्य नागरिकांना बसतो. खनिज तेलावरील अवलंबित्व कमी करण्यासाठी पर्यायी ऊर्जेला प्रोत्साहन देणे ही काळाची गरज आहे. इलेक्ट्रिक वाहने, जैवइंधन आणि स्वस्त सार्वजनिक वाहतूक यावर भर दिला पाहिजे. अन्यथा, वाढत्या महागाईची झळ येत्या काळात थेट सामान्यांच्या चुलीपर्यंत पोहोचल्याशिवाय राहणार नाही.

## प्रासंगिक »

### प्रेम

**एक तरुण कडक उन्हात बागेत काम करत होता. सूर्य डोक्यावर आला तरी तो कामातच गुंतलेला होता. त्याची आई वारंवार म्हणत होती, “गोविंदा, ऊन खूप आहे, आता घरात ये.”**

पण तो तिचे बोलणे ऐकत नव्हता. शेवटी आईने त्याच्या लहान मुलाला उचलले आणि उन्हात त्याच्याजवळ नेऊन ठेवले. हे पाहताच गोविंदा संतापून म्हणाला, “आई, एवढ्या उन्हात चंदूला का आणलंस? त्याला त्रास होईल!”

आई शांतपणे म्हणाली, “ऊन लागलं तर काय झालं?” गोविंदा काळजीने म्हणाला,“तो माझा मुलगा आहे. त्याला त्रास झाला तर माझ्याही जिवाला वेदना होतात.” त्यावर आई प्रेमाने म्हणाली, “बाळा, जशी तुला तुझ्या मुलाची काळजी वाटते, तशीच काळजी मला तुझी वाटत असेल ना?

तू इतका वेळ उन्हात काम करतो आहेस, त्यामुळे माझ्याही मनाला त्रास होतो.” आईचे हे शब्द ऐकून गोविंदाला आपली चूक समजली. तो हसत हसत काम आवरून घरात गेला.

- तात्पर्य : स्वतः पालक झाल्याशिवाय आई-वडिलांचे प्रेम, माया आणि काळजी समजत नाही.

कडक उन्हामुळे देशभर होरपळ सुरू असताना भारतीय हवामान खात्याने दिलेली मान्सूनच्या आगमनाची आनंदवार्ता दिलासादायक ठरत आहे.

# मान्सूनचे शुभवर्तमान आणि जलसंवर्धनाची गरज



यंदा मान्सून वेळेपूर्वी दाखल होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली असून, बंगालचा उपसागर आणि अंदमान परिसरात त्याच्या हालचालींना वेग आला आहे. समुद्रावरील वाऱ्यांची दिशा, आर्द्रता आणि वातावरणीय दाब यांसारखे घटक सध्या अनुकूल असल्याने केरळसह महाराष्ट्रातही पावसाचे आगमन लवकर होण्याची चिन्हे आहेत.

भारतीय शेती आणि अर्थव्यवस्था मोठ्या प्रमाणात मान्सूनवर अवलंबून आहे. खरीप हंगामातील पेरणी, धरणांतील पाणीसाठा, जलविद्युत निर्मिती आणि पिण्याच्या पाण्याची उपलब्धता या सर्व गोष्टी पावसाशी जोडलेल्या आहेत. त्यामुळे मान्सून वेळेवर येणे ही केवळ हवामानविषयक घटना नसून देशाच्या आर्थिक स्थैर्याशी संबंधित बाब आहे.

वेळेवर पाऊस झाल्यास जमिनीतील ओलावा वाढतो, शेतीला चालना मिळते आणि अन्नधान्य उत्पादनात वाढ होते. याउलट मान्सून लांबल्यास शेतीचक्र विस्कळीत होऊन त्याचा परिणाम महागाईवरही होतो.मात्र, हवामान बदलामुळे मान्सूनचे स्वरूप अधिक अनिश्चित होत चालले आहे. पूर्वी अनेक दिवस पडणारा पाऊस आता कमी कालावधीत अतिवृष्टीच्या स्वरूपात कोसळताना दिसतो. त्यामुळे वेळेवर आलेल्या मान्सूनमध्येही खंड पडल्यास शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट निर्माण होते. यंदा अल निनो सक्रिय असल्याने पर्जन्यमान कमी राहण्याची शक्यता वर्तवली जात असली, तरी इतिहासात अल निनोच्या काळातही भारतात समाधानकारक पाऊस झाल्याची उदाहरणे आहेत.

‘इंडियन ओशन डायपोल’सारखे घटक मान्सूनला पूरक ठरू शकतात. मान्सूनच्या आगमनाइतकेच महत्त्वाचे म्हणजे पावसाच्या पाण्याचे व्यवस्थापन. महाराष्ट्रातील जलयुक्त शिवारसारख्या योजनांमुळे अनेक गावांतील पाणीटंचाई दूर झाली आणि भूजलपातळीत वाढ झाली.

नाला खोलीकरण, सिमेंट बंधारे आणि जलसंधारणाच्या उपाययोजनांमुळे मोठ्या प्रमाणात पाणी साठवण क्षमता निर्माण झाली आहे. आज इंधन बचतीबाबत समाजात जागरूकता वाढत आहे. त्याचप्रमाणे पाणी वापराबाबतही जबाबदारीची भावना निर्माण होणे गरजेचे आहे. कारण इंधनाला पर्याय उपलब्ध असू शकतात, पण पाण्याला नाही. त्यामुळे यंदाच्या मान्सूनकडे केवळ आनंदाची बातमी म्हणून नव्हे, तर जलसंवर्धनाची संधी म्हणून पाहण्याची आवश्यकता आहे.

## ।। अभंगवाणी ।।



नाहीं काम माझें काज तुम्हांसवें ।
होतें गुप्त ठावें केलें आतां ॥१॥

व्यभिचार माझा पडिला ठाउका ।
न सर ती लोकांमाजी जालें ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# सुनेत्रा पवारांच्या अडचणीत वाढ?

## उपमुख्यमंत्रीपदाच्या शपथविधीविरोधात थेट राज्यपालांकडे नवी तक्रार दाखल

**महाईन्यूज । मुंबई**

**उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या विमान अपघाती निधनानंतर राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये अत्यंत नाट्यमय घडामोडी घडत आहेत. निवडणूक आयोगाला पाठवलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या (अजित पवार गट) नवीन राष्ट्रीय कार्यकारिणीच्या यादीतून प्रफुल पटेल आणि सुनील तटकरे यांची नावे वगळण्यात आली होती. यामुळे सुनेत्रा पवार यांच्या निर्णयाची चर्चा रंगली होती. त्यानंतर आता पुन्हा एकदा पवार यांच्याविरोधात तक्रार झाल्याने त्यांचा विषय चर्चेत आला आहे.**



सुनेत्रा पवार यांनी ३१ जानेवारीला उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. त्यांच्या रुपाने महाराष्ट्र राज्याच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री लाभल्या आहेत. राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी त्यांना गोपनियतेची शपथ दिली. मात्र, या चार दिवसांतच त्यांचा शपथविधी बेकायदेशीर ठरवा असे पत्र खुद्द राज्यपालांना देण्यात आले असून पुन्हा शपथ घ्यावी अशी मागणी करण्यात आली होती. या तक्रारीला १०३ दिवस झाल्यावरही राज्यपाल कार्यालयाकडून काहीही कारवाई न झाल्याने पुन्हा एकदा या प्रकरणात तक्रार करण्यात आली आहे. वर्धा येथील ॲड. हर्षवर्धन शोभा बाबाराव गोडघाटे यांनी राज्यपालांकडे आता थेट तक्रारच दिली आहे. यामध्ये शासनाच्याच एका आदेशाचा दाखल देऊन शपथविधी कसा बेकायदेशीर होतो हे सांगत १०३ दिवसांत कारवाई का नाही, असा प्रश्न केला आहे.

या प्रकरणामुळे राज्याच्या राजकीय वर्तुळात नव्या चर्चांना उधाण आले आहे. विरोधकांनीही या मुद्द्यावरून सरकारवर निशाणा साधण्यास सुरुवात केली आहे. शपथविधी प्रक्रियेमध्ये नियमांचे उल्लंघन झाल्याचा आरोप तक्रारदारांनी केला आहे. राज्यपाल कार्यालयाने याबाबत अद्याप अधिकृत भूमिका स्पष्ट केलेली नाही. त्यामुळे या तक्रारीवर पुढे कोणती भूमिका घेतली जाणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. कायदेशीर बाबींची तपासणी करून आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी, अशी मागणीही करण्यात आली आहे. या संपूर्ण प्रकरणामुळे राज्याच्या राजकारणात पुन्हा एकदा खळबळ उडाली आहे. दरम्यान, या प्रकरणावर सरकारकडून किंवा सुनेत्रा पवार यांच्याकडून अद्याप कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया समोर आलेली नाही.

### पुन्हा एकदा तक्रार का झाली?

ॲड. हर्षवर्धन गोडघाटे यांनी राज्यपालांकडे केलेल्या तक्रारीला १०३ दिवस पूर्ण झाले आहेत. संविधानानुसार मंत्र्यांनी शपथ घेऊनच खात्याची जबाबदारी स्वीकारणे आवश्यक असताना त्याचे उल्लंघन होत असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. तसेच शासन परिपत्रकानुसार १२ आठवड्यांत कारवाई बंधनकारक असताना राज्यपाल कार्यालयात निवेदन प्रलंबित ठेवणे म्हणजे कायद्याची पायमल्ली असल्याचे त्यांनी म्हटले असून, तातडीने कारवाई करण्याची मागणी केली आहे.

### नेमके प्रकरण काय?

राज्यपाल यांच्या कार्यालयातून सुद्धा ३१ जानेवारीला प्रसिद्धी पत्रक देण्यात आले. त्यातही उप-मुख्यमंत्री असा उल्लेख आहे. परंतु भारतीय संविधानाच्या अनुच्छेद १६४ नुसार मंत्र्यासंबधी अन्य तरतुदींमध्ये मुख्यमंत्री, राज्यपालाकडून नियुक्त केला जाईल आणि इत्तर मंत्री मुख्यमंत्र्यांच्या सल्यानुसार राज्यपालांकडून नियुक्त केले जातील अस उल्लेख आहे. ०१/०२/२०२६ रोजी महाराष्ट्राचे राज्यपाल यांनी सुनेत्रा अजित पवार यांना दिलेल्या शपथविधीमध्ये सुनेत्रा अजित पवार यांनी उप-मुख्यमंत्री पदाची शपथ घेत असल्याचे दोनदा म्हटले आहे. परंतु, हे असंवैधानिक व भारतीय संविधांच्या विरोधात आहे, असा आरोप आहे. भारतीय संविधानात कुठेही उप-मुख्यमंत्री पदाची तरतूद नाही. त्यामुळे सुनेत्रा अजित पवार यांनी उप-मुख्यमंत्री पदाची घेतलेली शपथ आपोआपच बेकायदेशीर आहे. त्यांच्याकडूनच सरळसरळ भारतीय संविधानाचे उल्लंघन झाल्याचाही आरोप आहे.

# अवैध वाळू चोरी करणाऱ्यांवर होणार कडक कारवाई; बावनकुळे यांचा इशारा!

**महाईन्यूज । नागपूर**

**नागपूर जिल्ह्यात नियमबाह्य वाळू वाहतूक आणि वाळू चोरीच्या घटना लक्षात आल्यानंतर पोलीस आणि महसूल विभागाला तत्काळ कारवाईच्या सूचना देण्यात आल्या आहेत. राज्यातील अवैध वाळू उत्खनन आणि वाहतुकीवर कठोर कारवाई केली जाणार असल्याची माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.**



नागपूरसह भंडारा आणि राज्यातील विविध जिल्ह्यांत मोठ्या प्रमाणावर कारवाई करण्यात आली आहे. जालना जिल्ह्यात जिल्हाधिकारी सौ. मित्तल यांनी केलेल्या कारवाईचेही त्यांनी कौतुक केले. राज्यात चुकीच्या पद्धतीने वाळूचे उत्खनन आणि वाहतूक चालू देणार नाही. यासंदर्भात महाराष्ट्रभर कडक कारवाईचे आदेश देण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

राज्याच्या विकासासाठी आणि पायाभूत सुविधांसाठी वाळू आवश्यक आहे. मात्र, वाळू वाहतूक ही नियमांच्या चौकटीत आणि रॉयल्टीनुसारच झाली पाहिजे. पाच-सहा ब्रासची रॉयल्टी भरून वीस ब्रास वाळूची वाहतूक केली जात असल्याचे प्रकार समोर आले आहेत. अशा अवैध प्रकारांना आळा घालण्यासाठी शासन प्रयत्नशील असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. अवैध वाळू उपशामुळे पर्यावरणाचे मोठे नुकसान होत असून यामुळे नदीपात्रांच्या सुरक्षेचाही प्रश्न निर्माण होत असल्याचे त्यांनी नमूद केले.

### प्रधान यांच्या राजीनाम्याची गरज नाही

काँग्रेसकडून केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करण्यात येत असल्याबाबत विचारले असता बावनकुळे म्हणाले की, “अशा प्रकारच्या घटना काँग्रेसच्या काळातही घडल्या आहेत. या विषयावर राजकारण करण्याची गरज नाही. कमी कालावधीत हे प्रकरण उघडकीस आणल्याबद्दल केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांचे आभार मानतो. विद्यार्थ्यांचे भविष्य उद्ध्वस्त करणाऱ्यांवर कठोर कारवाई झालीच पाहिजे असेही बावनकुळे म्हणाले.

“ राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली कोणतेही मतभेद असल्याचे त्यांना वाटत नाही. पार्थ पवार यांनी कोणत्या कारणासाठी भेट घेतली, याची माहिती माझ्याकडे नाही. राज्यात मंत्री फेरबदला संदर्भातील निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार ,यांच्या स्तरावर होणारा हा विषय आहे. या संदर्भात मला कोणतीही माहिती नाही. तसेच नीट परीक्षा प्रकरणातील दोषींवर कठोर कारवाई झाली पाहिजे.

- चंद्रशेखर बावनकुळे, महसूल मंत्री, महाराष्ट्र राज्य.

# युरेनियम हस्तांतरण अन् अणुकेंद्रांवर मर्यादा!

## अमेरिकेने इराणसमोर ठेवल्या ५ कडक अटी; जागतिक राजकारणात खळबळ

महाईन्यूज | अमेरिका

**अमेरिका आणि इराण या देशांमध्ये सध्या युद्धविराम असला तरीही वाटाघाटीचे प्रयत्न सुरू आहेत. दरम्यान, अमेरिकेने इराणला पाच अटी ठेवल्याचं समोर आलं आहे. इराणच्या फार्स न्यूज एजन्सीने यासंदर्भातील वृत्त दिलं असून पूर्वीचे निर्बंध आणि धोरणात्मक निर्णयामांमुळे झालेल्या नुकसानीसाठी इराणला कोणतीही भरपाई देण्यास वॉशिंग्टनने नकार दिला आहे. याशिवाय, वाटाघाटींचा भाग म्हणून इराणने ४०० किलोग्रॅम समृद्ध युरेनियम अमेरिकेकडे सुपूर्द करावे, अशी मागणीही अमेरिकेने केल्याचे समजते.**



अहवालात नमूद केलेली आणखी एक अट अशी आहे की, इराणचा फक्त एकच आण्विक प्रकल्प कार्यान्वित राहिला पाहिजे. तसेच इराणची परदेशातील गोठवलेली २५ टक्के मालमत्ता मुक्त करण्यासही अमेरिकेने नकार दिला असल्याचं सांगण्यात येत आहे. यासोबतच, अमेरिकेने विविध आघाड्यांवरील संघर्ष संपवण्याची प्रक्रिया या वाटाघाटी सुरू राहण्याशी आणि त्या पूर्ण होण्याशी जोडली आहे. 'वायनेट न्यूज'नुसार, इराणने या अटी मान्य केल्या तरीही अमेरिका आणि इस्रायलच्या आक्रमणाचा धोका कायम राहील, असेही या अहवालात नमूद करण्यात आले आहे.

इराणने युद्धाशी संबंधित नुकसानीसाठी भरपाई आणि जागतिक तेल वाहतुकीचा महत्त्वाचा मार्ग असलेल्या होर्मुझ सामुद्रधुनीवर आपल्या सार्वभौमत्वाला मान्यता देण्याची मागणीही केली आहे. 'तुर्किये टुडे'नुसार, इराणच्या सशस्त्र दलाच्या प्रवक्त्याने अमेरिकेला इशारा दिला आहे की, कोणत्याही नवीन लष्करी हल्ल्यांना अधिक जोरदार आणि गंभीर प्रत्युत्तर दिले जाईल. इराणच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते इस्माईल बकाई यांनी अमेरिकेवर लष्करी उद्दिष्टे साध्य करण्यासाठी मुत्सद्देगिरीचा (राजनैतिकतेचा) आडोसा घेतल्याचा आरोप केला आहे.

जागतिक ऊर्जा बाजारपेठेत शांतता आणि स्थैर्य राखण्यासाठी आपण काम करत असल्याचा अमेरिका आणि इस्रायलचा दावा खोटा असून, प्रत्यक्षात अस्थिरता आणि संघर्ष निर्माण करण्यास तेच जबाबदार असल्याचा आरोप इस्माईल यांनी केला. त्यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'X' वर लिहिले, "हा त्यांचा नेहमीचा, धूर्त डाव आहे. आधी संकट आणि युद्ध निर्माण करायचे आणि नंतर स्थैर्य पुनर्संचयित करणे आणि शांततेचे रक्षण करणे या उदात्त नावाखाली परिस्थिती आणखी चिघळवायची. ते स्वतः विनाश घडवून आणतात आणि त्याला शांतता म्हणतात."

### त्या पाच अटी कोणत्या?

- धोरणात्क निर्णयांमुळे झालेल्या नुकसानीसाठी इराणला कोणतीही भरपाई मिळणार नाही.
- इराणने ४०० किमी समृद्ध युरेनियम अमेरिकेला द्यावे
- इराणचा फक्त एकच आण्विक प्रकल्प कार्यान्वित राहिला पाहिजे.
- इराणची परदेशातील गोठवलेली २५ टक्के मालमत्ता मुक्त करण्यास नकार
- इस्रायबरोबरचा आक्रमणाचा धोका कायम राहणार

### युद्धात न मिळालेल्या गोष्टी मिळवण्याचा प्रयत्न


ट्रम्प यांनी नुकताच इराणचा १४ मुद्द्यांचा शांतता प्रस्ताव फेटाळला आहे. इराणच्या युद्ध समाप्तीसाठीच्या वाटाघाटींच्या प्रस्तावाला उत्तर देताना अमेरिकेने कोणतीही ठोस सवलत दिली नसल्याचे इराणी माध्यमांनी रविवारी सांगितले. "युनायटेड स्टेट्स कोणतीही ठोस सवलत न देता, युद्धात मिळवता न आलेल्या सवलती मिळवू पाहत आहे, ज्यामुळे वाटाघाटींमध्ये कोंडी निर्माण होईल", असं 'मेहर' वृत्तसंस्थेने म्हटले आहे. इराणी माध्यमांनी असेही वृत्त दिले आहे की, तेहराननने कोणत्याही चर्चेसाठी पाच विश्वास निर्माण करणाऱ्या पूर्वअटी ठेवल्या आहेत. यामध्ये सर्व आघाड्यांवरील, विशेषतः लेबनॉनमधील संघर्ष संपवणे, इराणवरील निर्बंध उठवणे आणि इराणचा गोठवलेला निधी मुक्त करणे यांचा समावेश आहे.

## 'राहुल, प्रियांका गांधी वायनाड विसरा' असे पोस्टर्स लावणं चांगलंच भोवलं

महाईन्यूज | केरळ

**केरळ विधानसभेच्या निवडणुकीत काँग्रेसला मोठं यश मिळाल्यानंतर देखील जवळपास दहा दिवस केरळच्या मुख्यमंत्री पदावरून अनेक राजकीय घडामोडी घडल्याचं पाहायला मिळालं होतं. केरळचा मुख्यमंत्री कोण होणार? याबाबत दहा दिवस चर्चा सुरू होत्या. मुख्यमंत्री निवडीवरुन काँग्रेसच्या सुरू असलेल्या बैठकांमधून ठोस निर्णय होत नसल्याने पक्षातील नेत्यांसह राज्यातील नागरिकांनी संताप व्यक्त केल्याचं पाहायला मिळालं होतं.**




या घडामोडी सुरू असताना राहुल गांधी यांच्या वायनाड मतदारसंघात देखील नागरिकांनी संताप व्यक्त करत राहुल गांधी यांच्या विरोधात पोस्टर्स लावत एक प्रकारे काँग्रेसला इशारा दिला होता. वायनाडमधून राहुल गांधी आणि प्रियांका गांधी यांच्याविरोधात पोस्टरबाजी करण्यात आली होती.

'राहुल गांधी आणि प्रियांका गांधी वायनाड विसरा' अशा आशयाचे पोस्टर्स लावण्यात आले होते. त्यामुळे या पोस्टर्सची देशभरात मोठी चर्चा झाली होती. दरम्यान, या प्रकरणात आता आणखी एक मोठी माहिती समोर आली आहे. राहुल गांधी आणि प्रियांका गांधी यांच्या विरोधात हे पोस्टर्स लावणं चांगलंच भोवलं आहे. या प्रकरणात पोलिसांनी गुन्हा दाखल करत पोस्टर्स लावणाऱ्यांचा शोध सुरू केला आहे. या संदर्भातील वृत्त एनडीटीव्हीने दिलं आहे.

राहुल गांधी आणि प्रियांका गांधी यांच्या विरोधात पोस्टर्स लावल्याच्या प्रकरणाबाबत माहिती देताना पोलिसांनी सांगितलं की, "आम्हाला सीसीटीव्ही फुटेज मिळाले आहेत. त्यामध्ये आम्हाला तेथील एक व्यक्ती भिंतींवर पोस्टर लावत असताना दिसत आहे. त्याची ओळख पटवण्याचं काम सुरू असून पुढील कारवाई केली जाईल." राहुल गांधी आणि प्रियांका गांधी यांच्या विरोधात पोस्टर्स लावल्याप्रकरणी वायनाडचे काँग्रेस आमदार टी.सिद्दीक यांनी पोलिसांत तक्रार दिली होती.

### गांधींच्या विरोधात नाराजी का?

काँग्रेसचे सरचिटणीस केसी वेणूगोपाल यांना मुख्यमंत्रीपदाची संधी दिली जाऊ शकते अशी चर्चा होती. यावरून राहुल गांधी यांना नाराजीचा सामना करावा लागला होता. वायनाडमधील काँग्रेस कार्यालयाबाहेर राहुल गांधी आणि प्रियांका गांधी यांच्या विरोधात पोस्टर्सबाजी करण्यात आली होती. जर वेणूगोपाल यांना मुख्यमंत्री केलं तर 'वायनाड ही पुढील अमेठी असेल' अशी पोस्टर्सबाजी करण्यात आली होती.

### पोस्टर्सवर काय लिहिलं होतं?

"मिस्टर राहुल आणि प्रियांका, वायनाड विसरा. तुम्ही पुन्हा येथून विजयी होणार नाही", असं लिहित काही पोस्टर्स वायनाडमधील जिल्हा काँग्रेस कमिटीच्या कार्यालयाबाहेर झळकवण्यात आले होते. त्या बरोबरच आणखी काही पोस्टर्स समोर आले होते. त्यामध्येही राहुल गांधी आणि प्रियांका गांधी यांना इशारा देण्यात आला होता. "मिस्टर राहुल, के.सी कदाचित तुमच्या बॅगा उचलत असतील, पण केरळची जनता तुम्हाला माफ करणार नाही", अशा संदेश दुसऱ्या पोस्टर्समधून देण्यात आला होता. दुसऱ्या एका पोस्टरवर "आरजी, पीजी हा इशारा नाही. या चुकीसाठी केरळ तुम्हाला माफ करणार नाही", असा इशारा देणारा आशय लिहिलेला होता.

# महागड्या स्किनकेअरपेक्षा तुपावर विश्वास!



आलिया भट्ट सध्या कान्स फिल्म फेस्टिव्हल २०२६मधील तिच्या रॉयल आणि ग्लॅमरस लूकमुळे चांगलीच चर्चेत आहे. तिच्या ड्रेसिंग स्टाईलसोबतच तिच्या चमकदार त्वचेचीही मोठ्या प्रमाणात चर्चा होत आहे. अनेकांना तिच्या ग्लोइंग स्किनचं रहस्य जाणून घ्यायचं होतं. याबाबत आलियाने नुकत्याच दिलेल्या मुलाखतीत एक खास खुलासा केला आहे. आलियाने सांगितलं की तिच्या सुंदर आणि निरोगी त्वचेचं रहस्य केवळ महागड्या स्किनकेअर उत्पादनांमध्ये नाही, तर भारतीय घरांमध्ये रोज वापरल्या जाणाऱ्या साध्या पदार्थांमध्ये दडलं आहे. विशेष म्हणजे तिने देसी तुपाला आपल्या ग्लोइंग स्किनचं मुख्य गुपित म्हटलं आहे. आलिया सांगते की ती शक्यतो घरचं आणि ताजं अन्न खाण्यावर भर देते. तिच्या आहारात तुपाचा नियमित वापर असतो. तिच्या मते तूप केवळ अन्नाची चव वाढवत नाही, तर शरीर आणि त्वचेलाही आतून पोषण देतं. त्यामुळे त्वचा अधिक चमकदार आणि निरोगी दिसते. तिने तिची खास "स्किन रेसिपी"ही चाहत्यांसोबत शेअर केली. आलिया तूप, वाटलेले शेंगदाणे, किसलेलं नारळ आणि गूळ एकत्र करून खाते. तिच्या मते या साध्या पदार्थांमुळे त्वचेला नैसर्गिक चमक मिळते आणि शरीरालाही ऊर्जा मिळते. ३३ व्या वर्षीदेखील तिची त्वचा तजेलदार दिसण्यामागे हा आहार महत्त्वाचा असल्याचं ती सांगते. देसी तूप आरोग्यासाठी अनेक प्रकारे फायदेशीर मानलं जातं. तूप पचन सुधारण्यास मदत करतं आणि शरीराला आवश्यक पोषण देतं. तसेच त्वचेचा कोरडेपणा कमी करून नैसर्गिक चमक टिकवून ठेवण्यास मदत करतं. गुळाचेही अनेक आरोग्यदायी फायदे आहेत. गूळ शरीरातील ऊर्जा वाढवतो, पचन सुधारतो आणि शरीरातील विषारी घटक बाहेर टाकण्यास मदत करतो. त्यात आयर्न असल्यामुळे रक्ताची कमतरता कमी होण्यासही मदत होते. नारळामध्ये फायबर, मॅग्नेशियम आणि पोटॅशियमसारखे पोषक घटक असतात. हे घटक त्वचेची लवचिकता टिकवून ठेवण्यास मदत करतात. तसेच शरीराला त्वरित ऊर्जा देण्याचं कामही नारळ करतो. आलियाने सांगितलेलं हे देसी स्किन सीक्रेट सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात चर्चेत असून अनेकजण तिच्या साध्या पण प्रभावी सौंदर्य रहस्याचं कौतुक करत आहेत.

# कान्स 2026मध्ये तारा सुतारियाचा ग्लॅमरस जलवा



फ्रान्समध्ये सुरू असलेल्या ७९व्या कान्स फिल्म फेस्टिव्हल २०२६मध्ये भारतीय कलाकारांचा दबदबा कायम पाहायला मिळत आहे. यंदा अभिनेत्री तारा सुतारिया हिने कान्समध्ये पदार्पण करताच आपल्या स्टायलिश आणि एलिगंट लूकने सर्वांचं लक्ष वेधून घेतलं आहे. तिचे फोटो आणि व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहेत. ताराने नुकतेच तिच्या सोशल मीडिया अकाउंटवर काही खास फोटो शेअर केले. या फोटोंमध्ये ती अतिशय रॉयल आणि ग्लॅमरस अंदाजात दिसत आहे. तिच्या या लूकची सोशल मीडियावर जोरदार चर्चा सुरू असून चाहत्यांसोबत अनेक सेलिब्रिटी देखील तिच्यावर कौतुकाचा वर्षाव करत आहेत. कान्स फिल्म फेस्टिव्हलमधील 'वुमन इन सिनेमा' गाला कार्यक्रमात तारा सुतारियाला सन्मानित करण्यात आले. हा क्षण तिच्यासाठी खूप खास असल्याचं तिने आपल्या पोस्टमध्ये सांगितलं. हा अनुभव कायम आपल्या मनात राहील, असंही तिने नमूद केलं. तिच्या या यशामुळे चाहत्यांमध्ये आनंदाचं वातावरण आहे. गाला नाईटसाठी ताराने ऑफ-व्हाईट रंगाचा बॉडी फिटेड गाऊन निवडला होता. या गाऊनचा फ्लोई डिझाईन आणि लांब ड्रेप स्लीव्ह्समुळे तिचा संपूर्ण लूक अतिशय क्लासी आणि रॉयल दिसत होता.

# डोळ्यांच्या सौंदर्याने वेधलं लक्ष



बॉलिवूडची 'देसी गर्ल' प्रियंका चोप्रा पुन्हा एकदा सोशल मीडियावर चर्चेत आली आहे. प्रियंका नेहमीच आपल्या कामासोबत वैयक्तिक आयुष्यातील खास क्षण चाहत्यांसोबत शेअर करत असते. यावेळी तिने इन्स्टाग्रामवर काही खास फोटो पोस्ट करत "माझ्या नव्या टप्प्याची सुरुवात" असं कॅप्शन दिलं आहे. तिच्या या पोस्टने सोशल मीडियावर मोठी चर्चा रंगली आहे. प्रियंकाने शेअर केलेल्या फोटोंमध्ये तिच्या मागील काही दिवसांतील खास क्षण पाहायला मिळतात. काही फोटोंमध्ये ती अतिशय स्टायलिश आणि आकर्षक दिसत आहे, तर काही फोटोंमध्ये ती निवांत वेळ घालवत असल्याचं दिसतं. तिच्या या फोटोंमधील डोळ्यांचं सौंदर्य विशेष चर्चेत आलं आहे.

# बॉलिवूड डेब्यू फ्लॉप, पण बनली साऊथची सुपरस्टार



बॉलिवूडमध्ये अनेक कलाकार मोठी स्वप्नं घेऊन येतात. काहींना सुरुवातीलाच यश मिळतं, तर काहींना अपयशानंतर स्वतःची वेगळी ओळख निर्माण करावी लागते. अशीच एक अभिनेत्री म्हणजे ज्योतिका. बॉलिवूडमधील पहिला चित्रपट फ्लॉप ठरूनही तिने हार मानली नाही आणि पुढे जाऊन साऊथ सिनेसृष्टीतील टॉप अभिनेत्रींपैकी एक बनली. ज्योतिकाने तिच्या अभिनय कारकिर्दीची सुरुवात हिंदी चित्रपटातून केली होती. तिने अभिनेता अक्षय खन्ना याच्यासोबत 'डोली सजा के रखना' या चित्रपटातून बॉलिवूडमध्ये पदार्पण केलं होतं. मात्र हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर विशेष चालला नाही. त्यामुळे तिच्या बॉलिवूड करिअरला अपेक्षित यश मिळालं नाही. हिंदी चित्रपटसृष्टीत अपयश आल्यानंतर ज्योतिकाने तमिळ सिनेसृष्टीकडे मोर्चा वळवला. तिथे मात्र तिच्या अभिनयाला मोठी पसंती मिळाली. नैसर्गिक अभिनय, साधेपणा आणि स्क्रीनवरील प्रभावी उपस्थितीमुळे ती अल्पावधीतच प्रेक्षकांची आवडती अभिनेत्री बनली. तमिळ चित्रपटांमधील तिच्या भूमिकांना प्रेक्षकांनी भरभरून प्रेम दिलं. ज्योतिका केवळ तमिळच नव्हे तर तेलुगू आणि मल्याळम चित्रपटांमध्येही झळकली आहे.

# IPLचा किंग विराट कोहलीच!

## ५०० धावांचा टप्पा गाठताच इतिहास घडवला

**महाईन्यूज । धरमशाला**

**धरमशालाच्या नयनरम्य मैदानावर आयपीएल २०२६ च्या प्लेऑफमधील महत्त्वाचा सामना खेळवला जात आहे. गतविजेते रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि पंजाब किंग्स यांच्यात हा सामना होत आहे. पंजाबचा संघ जिंकला तर ते प्लेऑफच्या शर्यतीत कायम राहतील आणि आरसीबी जिंकली तर ते प्लेऑफसाठी पात्र ठरणारा पहिला संघ ठरतील. त्यामुळे दोन्ही संघांसाठी हा सामना महत्त्वाचा आहे. यादरम्यान प्रथम फलंदाजी करताना विराट कोहलीने आपल्या सावध परिणामी आक्रमक खेळीच्या बळावर नवा विक्रम आपल्या नावे केला आहे.**

रजत पाटीदारच्या अनुपस्थितीत आजच्या सामन्यात जितेश शर्मा संघाचं नेतृत्त्व करत आहे. पंजाब किंग्सने या सामन्याची नाणेफेक जिंकत प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला आणि आरसीबीला फलंदाजीसाठी पाचारण केलं. आरसीबीकडून विराट कोहली व जेकब बेथलची जोडी फलंदाजीला उतरली. यासह विराटने १६ धावा करताच यंदाच्या आयपीएलमध्ये ५०० धावांचा टप्पा पूर्ण केला.

विराटने सलग चौथ्यांदा आयपीएलमध्ये ५०० अधिक धावा केल्या आहेत. विराट कोहली हा



आयपीएल इतिहासात एकाच सीझनमध्ये सर्वाधिक वेळेस ५०० अधिक धावा करणारा एकमेव फलंदाज आहे. विराटने ९ वेळा एका हंगामात ५०० अधिक धावा केल्या आहेत. या यादीत दुसऱ्या क्रमांकावर डेव्हिड वॉर्न आणि केएल राहुल आहेत. ज्यांनी ७ वेळा एका सीझनमध्ये ५०० अधिक धावा केल्या. तर शिखर धवनने ५ वेळा ही कामगिरी केली.




# KKRच्या विजयाने प्लेऑफच्या शर्यतीतील संघांना मोठा धक्का

**महाईन्यूज । कोलकाता**

**कोलकाता नाईट रायडर्स आणि गुजरात टायटन्स यांच्यातील शनिवारी झालेल्या सामन्यात केकेआरने विजय मिळवला. कोलकाताने ईडन गार्डन्सच्या मैदानावर २९ धावांनी विजय मिळवत गुजरातचा सलग ५ विजयांनंतरचा विजयरथ रोखला. केकेआरने प्रथम फलंदाजी करताना टॉप-३ फलंदाजांच्या बळावर २४७ धावांचा डोंगर उभारला होता. तर प्रत्युत्तरात गुजरातचा संघ फक्त २१८ धावा करण्यात यशस्वी ठरला. या विजयानंतर केकेआरला गुणतालिकेत एका स्थानाचा फायदा झाला आहे.**




केकेआरच्या विजयानंतर आयपीएल २०२६ च्या गुणतालिकेत मोठा बदल झाला आहे. आयपीएल २०२६ च्या गुणतालिकेत, आरसीबी सध्या १६ गुणांसह अव्वल स्थानी आहे, तर गुजरात टायटन्सचेही १६ गुण आहेत. दरम्यान, सनरायझर्सहैदराबाद संघ १४ गुणांसह तिसऱ्या क्रमांकावर कायम आहे. पंजाब किंग्स १३ गुणांसह चौथ्या, तर राजस्थान रॉयल्स १२ गुणांसह पाचव्या स्थानावर आहे.

चेन्नईचा संघ १२ गुणांसह सहाव्या स्थानावर कायम आहे. दुसरीकडे, केकेआरने एक स्थान वर येत ११ गुणांसह आता सातव्या स्थानावर झेप घेतली आहे. दिल्ली आता १० गुणांसह आठव्या स्थानावर पोहोचली आहे. मुंबई आठ गुणांसह नवव्या स्थानावर आहे, तर लखनौ आठ गुणांसह शेवटच्या स्थानावर आहे.

केकेआरच्या या विजयाचा दिल्लीसह शर्यतीत असलेल्या सर्व संघांना चांगलाच फटका बसला आहे. केकेआरचे अजून दोन सामने शिल्लक असून संघ १५ गुणांपर्यंत पोहोचू शकतो. यादरम्यान पंजाब किंग्सला जर प्लेऑफ गाठायचं असेल तर आरसीबीविरूद्धचा सामना त्यांना कोणत्याही स्थितीत जिंकावा लागेल. तरच ते शर्यतीत कायम राहू शकतील. याशिवाय दिल्लीविरूद्धचा सामना जर राजस्थानने जिंकला तर प्लेऑफची शर्यत अधिक चुरशीची होऊ शकते.

आयपीएल आता अखेरच्या टप्प्यात आली असून सर्व संघांचे १-२ सामने शिल्लक आहेत. त्यामुळे प्रत्येक सामन्यानंतर प्लेऑफचं समीकरण प्रत्येक संघासाठी बदलत जाणार आहे. सध्याच्या घडीला दोन स्थांनासाठी ६ संघ कायम आहेत. त्यामुळे प्रत्येक संघाची नजर सामना जिंकण्यावर असणार आहे.

रविवारी १७ मे रोजी दोन सामने होणार असून पहिला सामना रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि पंजाब किंग्स यांच्यात होणार आहे. तर दुसरा सामना दिल्ली कॅपिटल्स विरूद्ध राजस्थान रॉयल्स यांच्यात होणार आहे.

स्मार्ट PCMC SMART CITY
महाईन्यूज™
epaper.mahaenews.com
ePaper
। सोमवार ।
दि. 18 मे 2026 ।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# आकुर्डीत रुग्णालयातील गैरसोयींचा भडका; रुग्ण संतप्त

महाईन्यूज ।
पिंपरी-चिंचवड

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या आकुर्डी येथील कै. प्रभाकर मल्हारराव कुटे मेमोरियल रुग्णालयात मूलभूत सुविधांचा अभाव असल्याने रुग्णांना मोठ्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे. सुमारे 39 कोटी रुपये खर्च करून उभारण्यात आलेले हे 100 बेडचे, पाच मजली रुग्णालय असून दररोज 900 ते 1 हजार रुग्ण उपचारासाठी येतात. मात्र, रुग्णसंख्येच्या तुलनेत सुविधा अपुऱ्या पडत असल्याचे चित्र समोर आले आहे.

रुग्णालयात विविध अत्याधुनिक विभाग कार्यरत असले, तरी प्रत्यक्षात रुग्णांना आवश्यक सेवा वेळेत मिळत नसल्याने नाराजी व्यक्त होत आहे. विशेषतः सोनोग्राफीसाठी रुग्णांना दोन आठवड्यांपर्यंत प्रतीक्षा करावी लागत आहे. दोन मशीनपैकी एक बंद असल्याने उर्वरित मशीनवर मोठी गर्दी होत असून, गरोदर महिलांना याचा सर्वाधिक त्रास सहन करावा लागत आहे. रुग्णालयात कॅन्टिनची सुविधा नसल्याने रुग्णांसोबत आलेल्या नातेवाईकांची मोठी गैरसोय होत आहे. प्रसूती झालेल्या महिला, शस्त्रक्रिया झालेल्या रुग्णांसोबत असलेल्या व्यक्तींना अन्नासाठी बाहेर जावे लागते. परिसरातही हॉटेल्स उपलब्ध नसल्याने ही समस्या अधिक तीव्र झाली आहे. महिला विभागातील स्वच्छतागृहांची अवस्था देखील अत्यंत दयनीय आहे. काही स्वच्छतागृहे बंद असून, वापरात असलेल्या ठिकाणी तुटलेले नळ, प्रेशर पाईप आणि खराब दरवाजे अशी परिस्थिती आहे. वॉशबेसिनही बंद असल्याने स्वच्छतेच्या मूलभूत सुविधा उपलब्ध नसल्याचे दिसून येते. याशिवाय, रुग्णालयातील काही कर्मचाऱ्यांकडून रुग्ण व नातेवाईकांशी उद्धट वागणूक दिली जात असल्याच्या तक्रारी पुढे आल्या आहेत. रुग्णांना आवश्यक माहिती वेळेवर न देणे, मार्गदर्शनाचा अभाव अशा प्रकारांमुळे नागरिकांमध्ये नाराजी वाढत आहे.


एकीकडे रुग्णालयाला राज्यस्तरीय गौरव मिळालेला असताना, दुसरीकडे मूलभूत सुविधांच्या अभावामुळे रुग्णांना त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे महापालिका प्रशासनाने तातडीने लक्ष देऊन आवश्यक सुधारणा करण्याची मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

## सुविधांचा अभाव; रुग्ण त्रस्त

कुटे मेमोरियल रुग्णालयात सोनोग्राफीसाठी दोन आठवड्यांची प्रतीक्षा, कॅन्टिनचा अभाव आणि स्वच्छतागृहांची दयनीय अवस्था यामुळे रुग्ण व नातेवाईक त्रस्त आहेत. मशीन बंद असल्याने तपासणीत विलंब होत असून, कर्मचाऱ्यांच्या उद्धट वागणुकीबाबतही तक्रारी वाढल्या आहेत. त्यामुळे महापालिकेने तातडीने सुविधा सुधाराव्यात, अशी मागणी होत आहे.



D Y PATIL INTERNATIONAL UNIVERSITY AKURDI PUNE
Think | Thrive | Transform
ADMISSION OPEN
A.Y. 2026



*DYPIU is a trendsetting international university focused on preparing students for the future by offering innovative curriculum and unique features that foster creativity, entrepreneurship, & leadership.*
*It empowers students to be job creators rather than job seekers in the rapidly evolving technology landscape.*

**UG/PG Programs**
- B.Tech. – Bioengineering
- B.Tech. – Chemical Engineering
- B.Tech. – Civil Engineering
- B.Tech. – Mechanical Engineering
- B.Tech. – Semiconductor Engineering
- B.Tech. – Computer Science and Engineering
- B.Tech. – Computer Science and Engineering in Artificial Intelligence & Machine Learning in association with IBM
- B.Tech. – Computer Science and Engineering in Cyber Security and Forensic in association with IBM
- B.Sc. (Hons.) – Economics
- B.Sc. (Hons.) – Forensic Sciences
- BCA (Hons.)
- BBA (Hons.)
- BA (Hons.) – Journalism & Mass Communication
- BA (Hons.) – Liberal Arts
- BFA
- B.Design
- M.Sc. – Medical Biotechnology
- M.Sc. – Medicinal Chemistry
- M.Sc.– Computational Mathematics
- M.Tech. – Computer Science and Engineering in Quantum Computing.
- MCA
- MA – Journalism & Mass Communication
- MBA – Digital Business
- MBA – Executive
- Ph.D.

Follow us on
WhatsApp

2025 Excellence in Chemical Engineering for a Sustainable Future
2025 Bright Blue Print in Civil Engineering Education
2025 Creative Excellence in Film Studies & Media Research
2024 Excellence in Digital Disruption
2024 Most Promising Engineering University in India
2024 Game Changer in Bioengineering Education
2024 Trailblazer in Semiconductor Engineering

CONTACT
Phone Number: 8600091180
Website: dypiu.ac.in
Email: admission@dypiu.ac.in
APPLY NOW
D. Y. Patil International University, J Block, Sector 29, Akurdi, Pune 411044

# सोसायटीधारकांच्या न्याय हक्कांसाठी फेडरेशन कटिबद्ध!

## नवनिर्वाचित अध्यक्ष सचिन लोंढे अन् कार्यकारिणीचा संकल्प; सचिवपदी सचिन गुणाले

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी चिंचवड सहकारी गृहनिर्माण संस्थांचा महासंघ मर्यादित, वाकड यांच्या नव्याने निवडून आलेल्या व्यवस्थापन समितीची पहिली बैठक उत्साहात पार पडली. निवडणूक निर्णय अधिकारी विलास लिंबळे यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत नवीन पदाधिकाऱ्यांची अधिकृत घोषणा करण्यात आली. महासंघाच्या अध्यक्षपदी सचिन लोंढे, सचिवपदी सचिन गुणाले तर कोशाध्यक्षपदी प्रदीप घोरपडे यांची सर्वानुमते नियुक्ती करण्यात आली.**



पिंपरी-चिंचवड शहरातील एकमेव नोंदणीकृत सोसायटी फेडरेशन सोसायटीधारकांच्या न्याय हक्कांसाठी महासंघ कटिबद्ध राहील, असा ठाम निर्धार यावेळी नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला. नागरिकांच्या मूलभूत नागरी प्रश्नांसाठी संघटितपणे लढा देण्यासोबतच सदस्य सोसायट्यांचे प्रश्न प्रशासनापर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यास प्राधान्य दिले जाणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

यावेळी नंदन इन्स्पेरा सोसाइटीच्या सांस्कृतिक सभागृहात ही बैठक संपन्न झाली. यावेळी सोसायटीचे चेअरमन युवराज हुगे, सचिव अतुल झाडे, खजिनदार नीरज राणे यांनी उपस्थितांना सन्मान केला.

नवनिर्वाचित सदस्यांच्या पहिल्याच बैठकीत सदस्य सोसायट्यांशी अधिक प्रभावी संवाद व्यवस्था उभारण्यावर बैठकीत विशेष भर देण्यात आला. प्रत्येक व्यवस्थापन समिती सदस्याकडे ९ सोसायट्यांची जबाबदारी सोपविण्यात येणार असून नवीन सदस्य सोसायट्या जोडून महासंघाचा विस्तार करण्याचा निर्णय घेण्यात आला.

नागरी प्रश्न सोडविण्यासाठी विभागनिहाय रणनीती तयार करण्यात येणार असून प्रत्येक प्रश्नासाठी विशेष अधिकारी नियुक्त करण्यात येणार आहेत. संबंधित अधिकाऱ्यांशी पत्रव्यवहार व समन्वयाची जबाबदारी या विशेष अधिकाऱ्यांकडे असेल. विविध विषयांसाठी “स्पेशल पर्पज कमिटी” स्थापन करण्यात येणार असून प्रत्येक समितीत सदस्य सोसायट्यांमधील सहा प्रतिनिधींचा समावेश असणार आहे. फेडरेशनच्या मासिक बैठका नियमित घेण्यात येणार असून प्रत्येक बैठकीचे इतिवृत्त सर्व सदस्य सोसायट्यांना अधिकृत माध्यमातून पाठविण्यात येणार असल्याचे बैठकीत स्पष्ट करण्यात आले.



“ पिंपरी चिंचवड परिसरातील सोसायटीधारकांच्या न्याय हक्कांसाठी महासंघ ठामपणे उभा राहील. पाणी, रस्ते, सुरक्षा, मालमत्ता कर, बिल्डर संबंधित प्रश्न तसेच विविध नागरी समस्यांबाबत सदस्य सोसायट्यांना सक्षम व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचे काम आम्ही प्राधान्याने करणार आहोत. महासंघ पूर्णपणे अपक्ष आणि पारदर्शक पद्धतीने कार्य करत सर्व सोसायट्यांना एकत्र घेऊन काम करेल.

**- सचिन लोंढे, अध्यक्ष, पिंपरी-चिंचवड सोसायटी फेडरेशन.**



## रावेतमध्ये दिवसाढवळ्या घरफोडी; १५ लाखांहून अधिक ऐवज लंपास

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

रावेत परिसरात भरदिवसा घरफोडीची धक्कादायक घटना उघडकीस आली असून अज्ञात चोरट्यांनी बंद फ्लॅटचा कोयंडा तोडून तब्बल १५ लाख २८ हजार रुपयांचा ऐवज लंपास केला आहे. याप्रकरणी रावेत पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ही घटना १५ मे २०२६ रोजी सकाळी १०.४५ ते दुपारी १२.३० वाजण्याच्या दरम्यान रावेत गावठाण येथील स्वामी समर्थ सोसायटीजवळील बबाई बिल्डिंगमधील फ्लॅट क्रमांक २०१ मध्ये घडली. फिर्यादी मनोज अशोक भोंडवे (वय २५, रा. रावेत) यांनी याबाबत तक्रार दिली आहे.

अज्ञात चोरट्यांनी घराचा कोयंडा तोडून घरात प्रवेश केला आणि घरातील १७८ ग्रॅम सोन्याचे दागिने, ७५ ग्रॅम चांदीचे दागिने तसेच १ लाख ४५ हजार रुपयांची रोख रक्कम असा एकूण १५ लाख २८ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला.

या प्रकरणी रावेत पोलिस ठाणे येथे भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम ३३१(३) व ३०५ अंतर्गत अज्ञात आरोपीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक खिळे करत आहेत.

## शहरात “हरित व आत्मनिर्भर शहर” संकल्पनेची सुरुवात

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**देशाचे आदरणीय पंतप्रधान नरेंद्रभाई मोदी यांनी ऊर्जा बचत, स्वदेशी उत्पादनांचा वापर, सार्वजनिक वाहतूक, पर्यावरण संवर्धन आणि शाश्वत जीवनशैलीबाबत केलेल्या आवाहनाला तसेच राज्याचे आदरणीय मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी दिलेल्या निर्देशांना प्रतिसाद देत पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेमध्ये व्यापक स्तरावर विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्याचा निर्णय मा. महापौर रवि लांडगे यांनी घेतला आहे.**



या संदर्भात मा. महापौरांनी मा. आयुक्तांना पत्राद्वारे सूचना देत महापालिका प्रशासन, अधिकारी-कर्मचारी, नागरिक, शाळा, गृहनिर्माण संस्था, उद्योग आणि सामाजिक संघटनांच्या सहभागातून “हरित, ऊर्जा सक्षम आणि आत्मनिर्भर पिंपरी-चिंचवड” घडविण्यासाठी विशेष मोहीम राबविण्याचे निर्देश दिले आहेत.

महापौरांच्या पुढाकारातून राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमांमुळे शहरात ऊर्जा बचत, इंधन बचत, पर्यावरण संरक्षण, स्वदेशी उत्पादनांना चालना, नागरिकांचा सहभाग आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढण्यास मोठी मदत होणार आहे. विशेष म्हणजे प्रशासनातील दैनंदिन कामकाजातही पर्यावरणपूरक आणि खर्च बचतीच्या पद्धतींचा अवलंब करण्यावर भर देण्यात येणार आहे.

या अभियानांतर्गत “हरित पिंपरी-चिंचवड आठवडा”, “नो पॉवर अवर”, “एक कर्मचारी – एक वृक्ष”, ई-वाहन व चार्जिंग स्टेशन प्रोत्साहन, “वर्क फ्रॉम होम / व्हर्च्युअल मीटिंग” धोरण, “स्वदेशी बाजार – आत्मनिर्भर पीसीएमसी”, पेपरलेस प्रशासन, “ऑईल फ्री हेल्दी कॅन्टीन”, “सौर पिंपरी-चिंचवड” अभियान, “ग्रीन रेटिंग” स्पर्धा, “सायकल टू वर्क डे”, नैसर्गिक शेती व टेरेस गार्डन प्रोत्साहन तसेच “हरित गणेशोत्सव / हरित उत्सव” यांसारखे महत्त्वपूर्ण उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

महापौरांच्या या पुढाकारामुळे शहरात हरित ऊर्जा वापराला चालना मिळणार असून प्रदूषण कमी करणे, इंधन बचत, वृक्षसंवर्धन, आरोग्यदायी जीवनशैली आणि स्थानिक उद्योगांना प्रोत्साहन मिळण्यास मदत होणार आहे.

“ देश आणि राज्य नेतृत्वाने दिलेला ऊर्जा बचत, पर्यावरण संवर्धन आणि स्वदेशीचा संदेश हा केवळ शासनाचा उपक्रम नसून तो प्रत्येक नागरिकाचा सहभाग असलेले जनआंदोलन व्हावे, हा आमचा प्रयत्न आहे. पिंपरी-चिंचवड शहर विकासासोबत पर्यावरण संरक्षणातही राज्यात आदर्श निर्माण करेल.

**– रवि लांडगे, महापौर, पिंपरी चिंचवड महापालिका.**

# विद्यानगर अत्याचार प्रकरण संतापजनक!

## चिमुकलीवर अत्याचार करणाऱ्या आरोपीला कठोर शिक्षा द्या; आमदार अमित गोरखे यांची मागणी

**महाईन्यूज ।**
**पिंपरी- चिंचवड**

**विद्यानगर परिसरात एका ८ वर्षीय चिमुकलीवर झालेल्या अत्याचाराच्या घटनेमुळे परिसरात संतापाची लाट उसळली असून, या प्रकरणातील आरोपीला कठोर शिक्षा झालीच पाहिजे, अशी मागणी आमदार अमित गोरखे यांनी केली आहे.**





या घटनेबाबत आमदार गोरखे यांनी तीव्र शब्दांत निषेध व्यक्त करत, “निष्पाप चिमुकलीवर झालेला अत्याचार हा अत्यंत संतापजनक आणि माणुसकीला काळिमा फासणारा प्रकार आहे. शहरात अशा विकृत प्रवृत्ती डोके वर काढत असतील, तर त्यांना वेळेतच ठेचून काढणे ही सर्वांची जबाबदारी आहे,” असे म्हटले आहे.

दरम्यान, पोलिसांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेत तपास वेगाने सुरू केला असून आरोपी अल्पवयीन असल्याचे निष्पन्न झाल्यानंतर त्याला तात्काळ ताब्यात घेऊन बालसुधारगृहात रवानगी करण्यात आली आहे. आरोपीच्या विकृत कृत्याचा विचार करता, कायद्याच्या चौकटीत राहून त्याला कठोरातील कठोर शिक्षा व्हावी, यासाठी पोलीस प्रशासन आणि लोकप्रतिनिधी कटिबद्ध असल्याचेही गोरखे यांनी स्पष्ट केले.

भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी विद्यानगर परिसरात तातडीने सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली असून, महिला व मुलींच्या सुरक्षेसाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले. तसेच, “पोलीस प्रशासनाने या प्रकरणाचा तपास जलदगतीने पूर्ण करून पीडित कुटुंबाला लवकर न्याय मिळवून द्यावा. जोपर्यंत पीडितेला न्याय मिळत नाही, तोपर्यंत आमचा पाठपुरावा सुरू राहील,” असे आश्वासन आमदार अमित गोरखे यांनी दिले.



## पिंपळेगुरवमध्ये टोळक्याचा धिंगाणा

**महाईन्यूज ।**
**पिंपरी- चिंचवड**

पिंपळेगुरव येथील मोरया पार्क परिसरात गुरुवारी रात्री अज्ञात टोळक्याने धिंगाणा घालत पार्किंगमध्ये उभ्या असलेल्या चारचाकी वाहनांची तोडफोड केल्याची घटना घडली. या प्रकारामुळे परिसरात काही काळ भीती आणि तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

मिळालेल्या माहितीनुसार, मोरया पार्क परिसरातील नदीकाठी असलेल्या पार्किंगमध्ये गुरुवारी रात्री सुमारे ११ वाजण्याच्या सुमारास काही अज्ञात व्यक्तींनी अचानक प्रवेश करून उभ्या असलेल्या वाहनांवर दगडफेक व तोडफोड केली. या घटनेत तीन चारचाकी वाहनांच्या काचा फोडण्यात आल्या असून वाहनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

या घटनेनंतर वाहनमालकांनी संताप व्यक्त केला असून परिसरातील नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. दरम्यान, या तोडफोडीचे काही व्हिडीओ समोर आले असून त्यामध्ये टोळक्याने केलेला धिंगाणा स्पष्टपणे दिसून येत आहे. ही घटना सांगवी पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली असून पोलिसांनी घटनास्थळी भेट देत पंचनामा केला आहे.

तसेच परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी सुरू करण्यात आली आहे. तोडफोडीमागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून अज्ञात आरोपींचा शोध सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली. या घटनेमुळे पिंपळेगुरव परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून रात्रीच्या वेळी पोलिस गस्त वाढवण्याची मागणी स्थानिकांकडून करण्यात येत आहे.

## सायन्स पार्क येथे दुर्मिळ संग्रहांचे भव्य प्रदर्शन..!

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**आंतरराष्ट्रीय संग्रहालय दिनानिमित्त पिंपरी चिंचवड सायन्स पार्क आणि तारांगण येथे दि.१७ व १८ मे २०२६ रोजी दुर्मिळ संग्रहांचे विशेष दोन दिवसीय प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. “विभाजित जगाला एकत्र आणणारी संग्रहालये” या यंदाच्या संकल्पनेवर आधारित या प्रदर्शनातून इतिहास, विज्ञान, कला आणि संस्कृतीचा अनोखा संगम अनुभवायला मिळणार आहे. संग्रहालये संवाद, समावेशकता, शांतता आणि सांस्कृतिक ऐक्यवाढविण्यास कशी महत्त्वाची भूमिका बजावतात, याचेही दर्शन या प्रदर्शनातून घडणार आहे.**





या प्रदर्शनात छंदसम्राट सामाजिक संस्थेशी संबंधित विविध कलाकारांचे दुर्मिळ व वैशिष्ट्यपूर्ण संग्रह प्रदर्शित करण्यात येणार आहेत. यामध्ये स्वाक्षऱ्या व छायाचित्रांचा संग्रह, दुर्मिळ नाणी, ‘चंद्रयान’ विषयावरील विशेष संग्रह, दुर्मिळ चित्रे, झेंटॅंगल कला तसेच पुरातन वस्तूंचा समावेश आहे. प्रदर्शनाची वेळ सकाळी १०.०० ते सायंकाळी ६.०० अशी राहणार आहे.

यासोबतच प्रेक्षकांसाठी विविध सर्जनशील व विज्ञानाधारित उपक्रमांचेही आयोजन करण्यात आले आहे. दि. १७ मे २०२६ रोजी आयसर, पुणे यांच्या माध्यमातून पेन प्लॉटर, स्पिन आर्ट आणि ३डी पेन यांसारख्या प्रत्यक्ष सहभागातून अनुभव घेता येतील अशा सर्जनशील उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच दोन्ही दिवशी दुपारी १२.०० व ३.०० वाजता खुली प्रश्नमंजुषा स्पर्धा आयोजित करण्यात आली असून सहभागींसाठी आकर्षक बक्षिसांचीही व्यवस्था करण्यात आली आहे.

याशिवाय पिंपरी चिंचवड प्लॅनेटेरियमच्या तिसऱ्या वर्धापन दिनानिमित्त १५ ते १७ मे २०२६ दरम्यान विज्ञान प्रात्यक्षिके, कार्यशाळा, खगोल निरीक्षण, मनोरंजनात्मक कार्यक्रम आणि तारामंडल डोम शो यांचेही आयोजन करण्यात आले आहे.

विद्यार्थी, विज्ञानप्रेमी, कला-संस्कृतीची आवड असणा-या प्रेक्षकांसाठी हा उपक्रम एक विशेष पर्वणी ठरणार असून, शोध, सर्जनशीलता, विज्ञान आणि मनोरंजनाचा अनोखा अनुभव या माध्यमातून घेता येणार आहे. सर्व प्रेक्षकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन प्रवीण तुपे यांनी केले आहे.


PRIYADARSHANI SCHOOL & JR COLLEGE
MOSHI
43 YEARS OF
NURTURING VALUES,
EXCELLENCE AND
TOMORROW'S LEADERS.
ADMISSIONS OPEN FOR AY 2026-27
Grade Nursery to Grade V
WHY CHOOSE PRIYADARSHANI SCHOOL?
43 Years of Excellence in Education | Advanced Robotics & Computer Labs
Experienced and Dedicated Faculty | Multiple Sports Grounds for All-Round Development
Proven 100% Results in Grade X | A Perfect Blend of Tradition and Innovation
+91 9890613333 | +91 9373073077
pgosm05@gmail.com
www.priyadarshanischoolmoshi.in